
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

अ



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II & III

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with OKEN Scanner

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I January - March - 2019

Marathi Part - II / III

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

संगीता पाटील

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**

**2018 - 5.5**

**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole

M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan

Aurangabad. (M.S.)

Scanned with OKEN Scanner

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांतील इयत्ता पाचवीमधील विद्यार्थ्यांना मराठी विषयातील ज्ञानरचनावादी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी - एक अभ्यास<br>**डॉ. चंद्रमोरे ए. एन.** | ५५-६० |
| १३ | अहिराणी बोलीभाषेतील म्हणी, वाक्प्रचार यांचा भाषाशास्त्रीय अभ्यास<br>**प्रा. डॉ. राजेंद्र आत्माराम पाटील** | ६१-६३ |
| १४ | भ्रष्टाचार ही एक समस्या<br>**प्रा. सिद्धार्थ मुंगे** | ६४-६६ |
| १५ | सूचना का अधिकार : सत्ता संस्कृती का बदलता परिदृष्य<br>**डॉ. बी. आर. भोसले** | ६७-७१ |
| १६ | बौद्ध धम्मातील कर्म सिद्धांत<br>**निवेदिता नागनाथ सातपुते** | ७२-७५ |
| १७ | मानवी सुरक्षा एक गंभीर प्रश्न<br>**डॉ. बी. डी. तोडकर** | ७६-८० |
| १८ | खान्देशातील जैन समुदायाचा राजकारणातील सहभाग एक चिकीत्सक अभ्यास<br>**डॉ. आर. व्हि. मस्के** | ८१-८३ |
| १९ | भारतामध्ये महिला सबलीकरण: सामर्थ्य आहे कर्तृत्वाचे<br>**डॉ. सुधीर ब. गायकवाड** | ८४-८७ |
| २० | भाववाढीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>**प्रा. हर्षवर्धन दामोदर जाधव** | ८८-९१ |
| २१ | भक्तिपरंपरेतील स्त्री संतांचे योगदान<br>**डॉ. संभाजी पाटील** | ९२-९९ |




Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5** (www.sjifactor.com)

# २१. भक्तिपरंपरेतील स्त्री संतांचे योगदान

**डॉ. संभाजी पाटील**
मराठी विभागप्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर.

**प्रास्ताविक**

महाराष्ट्र हा भारताच्या काहिसा मधोमध आहे. ही स्थाननिश्चिती करण्यात निसर्गाने जणू भोगोलिक विवेक साधला आहे. महाराष्ट्र ही संताची आणि वीरांची भूमी आहे. येथे वैराग्य आणि वीरश्री एकत्र नांदल्या आहेत. गडकोट किल्ल्यांचा देश असे ज्याचे सार्थ नामकरण करता येईल असा संबंध भारतात महाराष्ट्र हा एकच प्रांत आहे. किल्ल्यांप्रमाणे लेणी ही महाराष्ट्राच्या अनन्यासाधारणत्त्वाची महत्त्वाची खूण आहे. किल्ला ही वीरांची तशी लेणी वैराग्यांची वास्तू आहे. ही धर्मकारणाला सर्वस्व मानणारांची भूमी आहे. तशी धारातीर्थी देह ठेवणारांची आहे.

अमृताशी पैज जिंकणारी मराठी भाषा व साहित्य निर्मितीच्या जन्मखुणा शोधत असता ७ व्या शतकात शब्दरुपाने, ११ व्या शतकात वाक्यरुपाने आणि १२ व्या शतकात ग्रंथरुपाने मराठी भाषा समृध्द झालेली आपणास दिसते.

धर्म, संस्कृती आणि परंपरांचा आब राखण्याकरता आजपर्यंत या पृथ्वीच्या पाठीवर अगणित माणसे बळी देण्यात आली आहेत. विरोधाच्या आणि संघर्षाच्या भूमिकेवरुन या देशात एकत्र नांदणारे विविध धर्म, पंथ-उपपंथ, संप्रदाय व वाङ्मय यांचा एकमेकांवर प्रभाव पडणे अगदी स्वाभाविक आहे.

ईश्वरभक्ती, गुरुभक्ती, विषयविरक्ती, संसारनिवृत्ती व त्यातून प्राप्त होणारी परमसुख मनःशांती हेच संत साहित्याचे मूलभूत गाभातत्त्व आहे. १२व्या शतकात मराठी भाषेने आपला साहित्यरुपी संसार थाटला तो मुख्यतः वारकरी, महानुभवी आणि नाथसंप्रदायी संतांच्या सहाय्याने. पंचकृष्ण आणि विठ्ठल हे या संतांच्या वाङ्मयनिर्मितीचे प्रमुख, प्रभावी स्फूर्तिकेंद्र राहिले आहे. या प्रमुख पंथांनी केलेल्या कार्याचा महाराष्ट्राच्या समाजजीवनावर प्रभाव कसा आहे या प्रेरणेतून शोधनिबंधाचा विषय भक्ती परंपरेतील 'स्त्री संतांचे योगदान' असा निवडला आहे. शब्दांची मर्यादा आणि विषयाची व्याप्ती पाहता म्हणजे महानुभावी महंदबे पासून ते रामदासी संप्रदायिक वेणूबाई या संत कवयित्रींच्या अध्यात्मपर काव्याचा स्थूलस्वरुपात विचार करण्याची मर्यादा माझ यासमोरआहे.

कालपटाचा विचार करता संत साहित्य निर्मितीच्या सुरुवातीपासून १७ व्या शतकापर्यंतच्या म्हणजेच सुमारे पाचशे वर्षाच्या कालखंडात स्त्री संत विदुषीनी साहित्याच्या क्षेत्रात तत्कालीन सामाजिक व धार्मिक बंधने पाहता संख्येने कमी आली तरी गुणात्मकदृष्ट्या बहुमोल कामगिरी पार पाडली आहे. या देशाच्या मातीत अनेक धर्म, त्या त्या धर्माचे धर्म संप्रदाय, पंथ, उपपंथ त्यांच्या उपासना पद्धती व विशिष्टता यांचा मराठी वाङ्मयावर फार मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो.



Scanned with OKEN Scanner

त्या त्या संप्रदायाचा तत्त्वज्ञान उदयास आले. अनुयायांनी आपापल्या पंथ, संप्रदायाचे तत्त्वज्ञान, आचार-विचार पध्दती प्रादेशिक बोली भाषेतून सांगण्यास सुरुवात केली. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी पंथ प्रसाराबरोबरच साहित्यात मोलाची भर घातली आहे. या सर्वांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी ईश्वरभक्ती, गुरुमहिमा व त्यातून मिळणारी मोक्षप्राप्ती या प्रमुख गोष्टी दिसतात. स्त्री संताच्या साहित्याचा स्थूल विचार पुढील प्रमाणे करावयाचा आहे.

१. महदंबेचे धवळे

तिचे मूळ नाव रुपाई. ही पंथाचे आद्य आचार्य नागदेवाचार्य यांची चुलत बहीण. पती निधनानंतर तिची दादोस मार्फत श्रीचक्रधरांची भेट झाली. पुढे ती चक्रधरांची शिष्या बनली. गुरुविषयी अपार श्रध्दा पण तरीही तिची जागृत चोकस वृत्ती पाहून 'म्हातारी जीज्ञासकः म्हातारी चर्चकः म्हातारी एथ काही पुसतचि असे' अशी प्रशंसा खुद्द श्री चक्रधर करतात तर 'म्हातारी धर्मरक्षकः प्रीतिरक्षक' असा तिच्या कार्यकर्तृत्वाचा गुणगौरव भटोबास अभिमानाने करतात.

श्रीगोविंदप्रभूच्या सान्निध्यात असताना एका प्रसंगानिमित्त तिचे कवित्त्व जागे झाले. श्रीगोविंदप्रभूच्या उत्तेजनाने तिने धवळे रचले आणि गायिले. या धवळ्यांतून रुक्मिणी स्वयंवराची कथा सांगीतली आहे. पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन भागात धवळ्यांची निर्मिती झाली असून पूर्वार्ध ही महदंबेची स्वतंत्र व स्वयंभू निर्मिती आहे. तर उत्तरार्ध मात्र तिने म्हाइंभट व लक्ष्मीधर भटाच्या सहाय्याने रचला आहे.

ही स्वयंवर कथा शृंगारिक प्रेमाची नसून श्रीकृष्णावरील रुक्मिणीची भक्तिभावाची कथा आहे. प्रसंगचित्रण व व्यक्तिचित्रण ही या आख्यान कथाकाव्याची प्रमुख दोन अंगे. आरंभापासून अखेरपर्यंत कथानिवेदनात गतिमानता आहे. अकृत्रिम साधेपणाने नटलेले हे धवळे मराठी वाङ्मयात अजरामर लेणे ठरले आहे. म्हणूनच महदंबेचा आद्य मराठी कवयित्री मराठीतील कथा काव्यलेखन करणारी पहिली स्त्री असा तिचा गौरव केला जातो आहे.

धवळ्यांच्या निर्मितीबरोबरच महदंबेच्या नावावर ११० कडव्याचे मातृकी रुक्मिणी-स्वयंवर रचना आहे. यात धवळ्यातील कथाच पुन्हा थोडक्यात अधिक आटोपशीर सांगितली आहे. तसेच गर्भकांड ओव्या नावाचे एक प्रकरण व आरती ( वा. ना. देशपांडे- आद्य मराठी कवयित्री- प्रस्तावना) इ. साहित्यसंपदा तिच्यानावावर उपलब्ध आहे.

सदगुरुविषयी अपार श्रध्दा आणि श्रीकृष्ण भक्ती या तिच्या लेखनाच्या प्रमुख प्रेरणा असून ऐकणाऱ्यांच्या मनात श्रीकृष्णभक्तिभाव निर्माण करणे हा उद्देश त्यामागे दिसून येतो. महदंबेच्या साहित्यापासूनच खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या लिखित साहित्यास आरंभ झाला आहे. तिच्या धवळ्याने मराठी आख्यान काव्याचा पाया घालण्याचे काम केले आहे.

२. मुक्ताबाई

भक्ती परंपरेतील सर्वच लहान-मोठ्या कवी-कवयित्रींचा ज्ञानोबांच्या कवितेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असल्याचे दिसते. मुक्ताबाईच्या अभंगकाव्याची वाट तर ज्ञानेशांच्या अभंगातून गेली आहे. तिच्या काव्यावर ज्ञानेश्वर व इतर भावंडांची छाप दिसते. या चारी भावंडांची जन्म कहाणी धर्म व वर्णव्यवस्थेने एक गहन समस्या बनविली आहे. ती सोडविण्याच्या प्रयत्नात त्यांच्या माता-पित्यांना देहत्याग करावा लागला. त्यांच्या आत्मत्यागाने या भावंडांचे बालपण संपले कुमारपण शुध्दिपत्र



Scanned with OKEN Scanner

मिळविण्यात खर्च झाले. वडील भावंडाप्रमाणेच मुक्ताईचे बालपण प्रौढत्वामुळे व तरुणपण संतत्त्वामुळे झाकळून गेले. वैयक्तिक संसाराऐवजी सर्वजनांच्या आध्यात्मिक विकासासाठीची जबाबदारी मुक्ताईने स्वीकारल्याचे दिसते.

वयाने लहान तरीही संत मंडळीत मोठे स्थान व अधिकार असलेली मुक्ताबाई म्हणजे अध्यात्मिक परंपरेतील एक तेजस्वी विद्युलता होय. ती निरंतर मुक्त आहे म्हणूनच 'आधी तू मुक्तचि होतासि रे प्राणिया परि वासने पापिणिया नाडिलासी' असा विषयवासनेत मग्न झालेलया मानवास उपदेश करण्याचा तिला अधिकार मिळाला आहे.

योगिराज चांगदेवाने तिला गुरु मानावे या घटनेवरुन तिच्या अंगी सगुण व निर्गुण या अवस्थेच्या पलीकडे जाण्याचे सामर्थ्य जाणवते. तिचे योगमार्गाचा अनुभव सांगणारे कुट अभंग प्रसिध्द आहेत. सहा अभंग चांगदेवास बाळ कल्पून निर्माण झाले आहेत. जणू ते अंगाई गीतच आहेत. या काव्यातून तिचे स्त्रीसुलभ मन दिसते व स्वत्वाचा शोध लागल्याचा आनंद जाणवतो तर दुसरीकडे उद्‌विग्नावस्थेत ज्ञानदेवांनी स्वत:स कोंडून घेतले तेव्हा-

ताटी उघडा ज्ञानेश्वरा।

योगी पावन मनाचा।

साही अपराध जनाचा।।

अशा विनंतीतून ताटींच्या अभंगाची निर्मिती झाली आहे. या अभंगातून करुण रसासोबत अध्यात्मिक उंची व योगमार्गातील तिचा उच्चाधिकार सिध्द होतो.

मुक्ताईच्या उपलब्ध अभंगाची संख्या ४२ अशी मर्यादित असली तरी महाराष्ट्र सारस्वतकार म्हणतात त्याप्रमाणे वाचकास थक्क करणारी आहे. प्रखर विरक्ती, डोळस भक्ती, उच्च कोटीची योगानुभूती, गुरुबद्दल निस्सिम श्रध्दा, चांगदेवाविषयी अध्यात्मिक प्रेमातून उत्पन्न झालेली प्रीति आणि गुढ अनुभवांना सहज शब्दबध्द करणारी समर्थ प्रतिभा काव्यशक्ती.. आदि गुणांनी तिची अभंग रचना सकस समृध्द आहे. तिची काव्यनिर्मिती अलौकिक स्वरुपाची आहे. एकूणच मुक्ताबाईच्या अभंगरुपी काव्याने आणि अध्यात्मिक तेजाने भक्ती परंपरा उजळली आहे, असे म्हणता येईल.

**३. जनाबाई**

भक्ती परंपरेतील जाईची वेल म्हणून जिचा अभिमानाने उल्लेख केला जातो. ती जनाबाई दमा नावाच्या शूद्र भागवद्‌भक्ताची मुलगी. संत नामदेवाच्या घरी लहानाची मोठी होते. नामदेवाच्या सहवासात तिच्या मनात भक्तीचा अंकुर उगवला निस्सीम भक्तिभावामुळे तिचे अभंगरुपी काव्य फुलले, बहरले आणि तिच्या दरवळाने संपूर्ण संत वाङ्मय सुगंधित झाले.

पांडुरंग माझा पिता।

रखुमाई माझी माता।।

असे ईश्वराशी नाते जोडून ती पुढे म्हणते-

स्त्रीजन्म म्हणवूनी न व्हावे उदास।

साधुसंता ऐसे केले जनी। ।

विठ्ठलाचा कृपाप्रसाद आणि संतनामदेवाच्या सहवासामुळे जनीचे पोरकेपण संपले असे आत्मविश्वासाने उद्‌गार काढण्याइतकी आध्यात्मिक उंची तिने गाठली आहे.

भक्त आणि परमेश्वर यांच्या प्रेमळ भांडणाचा उत्तम नमुना जनाबाईच्या अभंगातून अनुभवास मिळतो आहे.

राग येवूनी काय करिसी।

तुझे बळ आम्हापाशी ।। तसेच

देव खाते देव पिते । देवावरी मी निजते।।

देव येथे देव तेथे । देवावीण नाही रिते । ।

जनीचे सगळे जीवनव्यवहार किती विठ्ठलमय झाले आहेत हे दिसून येते. 'नामयाची जनी' असा स्वतःचा उल्लेख करुन सदगुरु नामदेवाविषयीची आपल्या मनातील अपार कृतज्ञता व्यक्त करते. तशीच श्रध्दा, जिव्हाळा-

ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।

मरोनिया जावे। बा माझ्या पोटा यावे ।

ती संत ज्ञानेश्वराविषयी व्यक्त करते आहे. संत नामदेवामुळे ज्या ज्या संत महात्म्याचा सहवास जनीला लाभला त्या सर्वाविषयीचा आदरयुक्त प्रेमभाव व्यक्त करते तर काहीचे अभंगरुपी चरित्र कायमचे चिरस्मरणीय कोरुन ठेवण्याचे काम जनाबाईने केले आहे.

जनाबाईच्या अभंगवाणीवर संत नामदेव- ज्ञानदेवांचा प्रभाव असल्याने सांगितले जाते. असे असले तरी तिची स्वयंभू काव्यप्रतिभाशक्ती अभंगातून प्रकाशताना दिसते.

संत जनाबाईने श्रीकृष्णाविषयी बालक्रीडा अभंग, हरिश्चंद्राख्यान आणि थालीपाक इ. रचनांची निर्मिती करुन मराठी संत साहित्य समृध्द करण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. आधीच शुद्र त्यात हे पोरकेपण त्यात पुन्हा स्त्रीजन्म नामदेवाच्या घरी घरकाम करणारी स्त्री. कौटुंबिक आणि सामाजिक प्रतिष्ठा शून्य असलेली दासी जनी केवळ आणि केवळ गुरुकृपा आणि भक्तीच्या बळावर भक्ती परंपरेत आणि संत वाड्मयात चिरंतन ठरली आहे.

**४. सोयराबाई**

धर्मव्यवस्था, वर्णव्यवस्था आणि विषम समाजव्यवस्थेने अस्पृश्य ठरवलेल्या महार जातीत चोखाबांच्या जन्म झाला. पूर्वजन्मीचे फळ म्हणून सामाजिक अप्रतिष्ठा व दारिद्रयाचे आघात निमूटपणे सहन केले पाहिजेत अशी परम विठ्ठलभक्त चोखाबांची श्रध्दा होती. (अशी मानसिकता बनण्यास तत्कालीन समाजव्यवस्था कारणीभूत असावी)

चोखोबाच्या भक्तीच्या आध्यात्मिक प्रभाव संपूर्ण कुटुंबावर पडल्याचे दिसते. चोखोबाची महारी असा स्वतःची उल्लेख करुन सोयराबाई आपले अंतःकरण अभंगरचनेतून विठ्ठलाजवळ मोकळे करते आहे. पंढरपूरच्या ब्राह्मणांनी चोखोबांचा छळ केल्याची तक्रार खालील अभंगातून तिने नोंदवून ठेवली आहे.



Scanned with OKEN Scanner

पंढरीचे ब्राह्मणे चोख्याशी छळिले।

जयालागी केले नवल देवे।।

सामाजिक विषमतेबरोबरच आर्थिक दारिद्र्याचे दुःखही सोयराबाईने आपल्या अभंगाचा विषय बनवले आहे.

आमची तो दशा विपरीत झाली।

कोण आम्हा घाली पोटामध्ये।।

सुखात सगळेच वाटेकरी, दुःखात मात्र कोणी नाही या मानवी स्वार्थी प्रवृत्तीवर हल्ला करुन ईश्वरभक्तीकडे दुर्लक्ष करुन केवळ संसारच सर्वस्व मानणाऱ्यांची सोयराबाईने कडक शब्दात कानउघडणी केली आहे.

किती हे सुख मानिती संसाराचे। काय हे साचे मृगजळ।।

विषय वासनेतून मुक्त होऊन पांडुरंगावर तिची उदंड श्रध्दा बसली आहे. या संसाररुपी महासागरातून आपली सहज व सुरक्षित सुटका केवळ हरिनामामुळेच होणार असल्याचा विश्वास खालील अभंगातून व्यक्त करते आहे.

नाही उरली वासना। तुम्हा नारायण पाहता।।

उरला नाही भेदाभेद । झाले शुध्द अंतर।।

सोयराबाईचे अभंग संख्येने कमी असले तरी तिची अध्यात्मिक उंची खूप वरच्या पातळीवरची आहे. तिच्या मोजक्याच पण गुणात्मक अभंगरचनेमुळे संत काव्य वाङ्मयाची समृध्दता आणि उंची वाढण्यास मदत झाली आहे.

**५. निर्मळा**

निर्मळा चोखोबांची बहीण, हरिभक्तीत तल्लीन झालेली दिसते. तिचा एकेक अभंग म्हणजे छोटेसे करुण आर्त भावगीत आहे. संसारात सुख नाही आणि नामाचीही गोडी नाही, ओढ नाही. अशी मनाची द्विधावस्था व्यक्त करणे तिच्या अभंगाचा विषय आहे.

सुख अणुमात्र नाही संसारी । सदा हावभरी रात्रंदिवस।।

तिच्या मनाची व्याकुळता व शुध्द भक्तिभाव पाहून हरिला तिची करुणा आली आणि ती या द्विधावस्थेतून बाहेर पडली.

मज नामाची आवडी । संसार केला देशोधडी ।।

हरिनामाची गोडी आणि संसार विरक्ती पर्यंतचा तिचा झालेला अध्यात्मिक विकास परमार्थाविषयी बोलणे सोपे आहे. पण आचरणात आणणे खुप कठीण असल्याची जाणीवही निर्मळा करुन देते. शुध्द आणि निस्सीम भक्तीच आपणास या संसार तपातून सोडवून ईश्वराजवळ आणते असे निर्मळा सांगते. म्हणून शुध्द निर्मळ अंतःकरणाची निर्मळा, भक्ती गंगेत न्हावून निघालेली निर्मळा संत या उपाधीपर्यंत पोहचते. तिचे काव्य भक्ती रसात चिंब भिजलेले दिसते. भक्तीच्या बळावरच तिला संत साहित्यात मानाचे पान मिळाले आहे.



Scanned with OKEN Scanner

६. कान्होपात्रा

१३ व्या शतकात भक्तीमार्गाच्या वाटेवर धर्म आणि वर्णव्यवस्थेने नाकारलेल्या स्त्री-शुद्रांची वर्दळ सुरु झाली होती. कान्होपात्रा मंगळवेढा येथील श्यामा नावाच्या गणिकेची मुलगी. गणिकेची एक मुलगी वारकऱ्यांसोबत पंढरीस जाते आणि विठ्ठल दर्शन होताच आनंदाने मोहरुन जाते. आईचा शरीर विक्रीचा व्यवसाय न करता अनावर ओढीने कान्होपात्रा भक्ती मार्गात प्रवेश करते. ही घटनाच तिच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली आहे.

जन्मांतरीचे सुकृत आजी फळासी आले ।

म्हणोनी देखिले विठ्ठल चरण ।।

आपल्या मनाची झालेली उत्कट अवस्था ती वरील अभंगातून व्यक्त करते.

अप्रतिम सौंदर्यवती कान्होपात्रेच्या प्राप्तीसाठी बेदरच्या बादशाहाने माणसे पाठविली तेव्हा आपले शील भ्रष्ट होऊ नये म्हणून कान्होपात्रा म्हणते-

नको देवराया अंत पाहू आता । प्राण हा सर्वथा फुटो पाहे ।।

हरिणाचे पाडस व्याघ्रे धरियले । मजलागी जहाले तैसे देवा ।।

अशी आर्त हाक विठ्ठलास मारते. ती आर्त हाक ऐकून विठ्ठल तिच्या मदतीस धावून जातो. तिची प्राणज्योत पांडुरंग तत्त्वात विलीन होते.

बादशहापासून मिळणाऱ्या भौतिक सुखाचा त्याग करुन अध्यात्मिक आनंद प्राप्तीसाठी स्वत्व रक्षणार्थ देहत्याग करते ईश्वर प्राप्तीसाठीचे तिचे बलिदान अपूर्वच म्हणावे लागेल.

समाजव्यवस्थेने भ्रष्ट, पतित व यातिहीन ठरवलेल्या कान्होपात्रेची अगतिकता, हृदयभेदक आर्तता व स्त्री दुःखाची वेदना तिच्या अभंगातील शब्दाशब्दातून व्यक्त झाली आहे. विठ्ठलाचा कृपाप्रसाद प्राप्त झाल्यानंतर तिचा मानसिक आणि अध्यात्मिक विकास कसा झाला, याची प्रचिती तिच्या खालील अभंगातून येते-

नामे दोष जळती । नामे पापे उध्दरती ।।

हरनामात किती ताकद आहे. हरिनामाचा उच्चार केल्याने अशक्य त्या सर्व गोष्टी साध्य होतात. आणि शुध्द अंत:करणातून मारलेल्या भक्ताचीच हाक परमेश्वर ऐकतो असे तिचे सांगणे आहे.

ईश्वरप्राप्ती बरोबरच आपले चारित्र्य अभंग राहावे म्हणून देहत्याग करणारी कान्होपात्रा अभंगाच्या रुपाने कायम अभंग राहिली आहे.

**७. बहिणाबाई**

तुकोबांची वाणी आणि विचाराचा प्रभाव लोकमनावर पडत होता. त्यातून अनेकांनी प्रेरणा घेवून आपले भावविश्व फुलविले. त्या सर्वात बहिणाबाई आघाडीवर आहेत. संत नामदेव, संत तुकारामाचे जसे स्वप्नस्थ गुरु तसे तुकाराम प्रारंभी तरी बहिणाबाईचे स्वप्नस्थ गुरु होते. सद्गुरुच्या प्रत्यक्ष भेटीसाठी अनेक घात-आघात सहन करीत तिने पतीचे मतपरिवर्तन घडवून



Scanned with OKEN Scanner

आणले आणि बहिणाबाई तुकारामाच्या सहवासात आल्या. इतकेच नव्हे तर वारकरी संप्रदायाचा कळस ठरलेल्या तुकोबाची साक्षात फडकती ध्वजा बनल्या.

कौटुंबिक जीवन बहिणाबाईंना धरवत नाही तसे ते पूर्णतः टाकवतही नाही म्हणून त्यांच्या प्रापंचिक जीवनात विरक्ती जाणवते . पण परंपरेने जोपासलेल्या श्रध्दा, परंपरा, संकेत यांच्याशी त्या बंड करत नाहीत. त्यातून त्यांचे परंपरावादी मन व्यक्त होते.

स्त्री देहाची पराधीनता आणि वैराग्याची अनिवार ओढ अशा द्विधावस्थेत त्या सापडलेल्या दिसतात. म्हणूनच त्या म्हणतात-

स्त्रियेचे शरीर पराधीन देह । न चाले उपाय विरक्तीचा ।।

अशा आपल्या मनाची घालमेल त्या व्यक्त करतात. तेव्हा 'स्त्रीजन्म म्हणोनि व्हावे न उदास' असे म्हणणाऱ्या जनाबाईपेक्षा कितीतरी परंपरावादी व तडजोडवादी वाटतात. भक्तीबरोबर प्रखर ज्ञाननिष्ठेशी नाते जोडणाऱ्या बहिणाबाईंचा पारंपरिक दृष्टिकोन आणि स्त्री जीवनाविषयीचा अभंगातील कोरडेपणा खुपल्याशिवाय राहत नाही.

संत बहिणाबाई मृत्यूच्या दारात उभ्या असताना आपल्या बारा पूर्वजन्माची कथा सांगतात- आता पुढे जन्म नाही, म्हणून मागचे सारे जन्म क्षणभरच पण भोगून घेणारी बहिणाबाई एक एक पूर्वजन्माची उकल करीत वर्तमानकालीन जन्माचे रहस्य सांगते आहे. ही घटनाच आजच्या विज्ञानवादी जगात विस्मयकारक व नाट्यपूर्ण वाटते. त्याचबरोबर गुरु तुकारामाप्रमाणे काल्पनिक मृत्यूचा नव्हे तर साक्षात मृत्यूचा सोहळा मृत्यूपूर्वीच अनुभवणारी ही योगिनी आहे.

**८. वेणाबाई**

वारकरी आणि रामदासी संप्रदाय हे मूलतः भिन्न नसून रामदासी संप्रदाय हा वारकरी संप्रदायाचा एक उपसंप्रदाय आहे. भक्ती परंपरेतील शेवटची स्त्री संत कवयित्री म्हणून वेणाबाईचे नाव सन्मानाने घेतले जाते. वेणाबाई बालपणीच वैधव्याचे दुःख विसरण्यासाठी रामभक्तीकडे वळली. भिक्षा मागण्याच्या माध्यमातून रामदासांची व वेणाबाईची भेट झाली. त्यानंतर काही वर्षांनी तिने समर्थांचे शिष्यत्व पत्करले. या घटनेमुळे तिच्यावर नातेवाईकांनी विषप्रयोग केला होता. पण समर्थांच्या दर्शनामुळे विष उतरले अशी एक आख्यायिका आहे.

समर्थ रामदास वेणाबाईचे गुरु असले तरी एकनाथांचा खूप मोठा प्रभाव त्यांच्यावर होता. एकनाथाप्रमाणेच रामभक्ती वेणाबाईच्या भक्ती, चिंतन, मननाचा मुख्य विषय होता. एकनाथांनी ज्या कांडाशी आपले रामायण थांबविले तेथेच म्हणजे सुंदरकांडाशी वेणाबाईने आपले रामायण लिहिण्याचे थांबविले. समर्थांच्या भेटीपूर्वीच वेणाबाई नाथाची भेट झाली आहे असे आपणास म्हणता येईल.

असा प्रश्न त्यांच्याविषयी विचारला जातो आहे . एक मात्र खरे की वेणाबाई परंपरेने रामदासी असल्या तरी त्यांच्या मनावर संत एकनाथांचा मोठा प्रभाव होता हे जाणवते.



Scanned with OKEN Scanner

**सारांश**

मराठीची साहित्यगंगा प्रवृत्ती आणि निवृत्तीच्या काठाने वाहिली. दोन्ही तीरावरील लोकजीवनाला तिने अध्यात्मिकदृष्ट्या संपन्न केले. १३ ते १७ व्या शतकापर्यंत सुमारे पाचशे वर्षांच्या कालखंडात काव्यनिर्मिती करणाऱ्या महदंबा, मुक्ताई, जनाई, बहिणाई, सोयराबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई आणि वेणाबाई या संत कवयित्रीच्या अध्यात्मावर काव्याचा विचार केला असता आपणास त्यांच्या काव्याकडे स्वतंत्रपणे पाहता येत नाही हे दिसते. कारण या संतकवयित्रीच्या अध्यात्मिक जीवनावर आणि त्यातून अपरिहार्यपणे निर्माण होत असलेल्या काव्यावर सद्‌गुरुंचा खूप मोठा प्रभाव असल्याचे जाणवते. या सर्व संत महात्म्यांचा संत कवयित्रींच्या आचार आणि विचारांवर अंतर्बाह्य परिणाम झालेला दिसून येतो.

महानुभाव पंथाचे उपास्यदेवत श्रीकृष्ण, वारकारी संप्रदायाचे विठ्ठल आणि रामदासी संप्रदायाचे आराध्यदेवत श्रीराम ही देवते संबंधित कवयित्रींच्या अखंड भक्तिचिंतनाचा व काव्यरचनेचा विषय झाली आहेत. यामागे सांप्रदायिक भावना दडलेल्या आहेत.

कथात्म, ओवीबद्ध काव्यरचना करणाऱ्या महदंबा व वेणाबाई एका गटात तर अभंगरचना करणाऱ्या मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, कान्होपात्रा आणि बहिणाबाई दुसऱ्या गटात येतात. हा त्यांच्यातील जाणवणारा ठळक फरक लक्षात येतो. महदंबा व वेणाबाई ईश्वर कथनात रमतात तर या ईश्वरास आपल्या अनुभूतीचे केंद्र करुन त्यासंबंधीच्या भावना व्यक्त करण्यात मुक्ताई, जनाई, बहिणाई अधिक रमताना दिसतात. कथानिवेदन आणि आत्मनिवेदन हा त्यांच्या लेखनाचा एक विशेष म्हणता येईल.

स्त्री दुःखाची व्यथा हा सर्व स्त्री कवयित्रींच्या लेखनाचा समान धागा आहे. पण म्हणून त्या केवळ स्वच्या सुख-दुःखाशी कायम रेंगाळत नाहीत. त्या आपल्या दुःखास वाट करुन देतात. तसेच आपल्या पारमार्थिक अनुभवाचा आनंद व्यक्त करणे हाही त्यांच्या लेखनाचा विषय आहे.

सारांश या स्त्री संत कवयित्रींच्या कवितेने प्राचीन मराठी भक्ती कवितेच्या विकासाची दिशा व तिच्या प्रगतीचे टप्पे निश्चित करण्यात (काही उणिवा असल्या तरी) मोलाची भूमिका पार पाडली आहे. भक्ती काव्याला समृध्द करण्यात त्यांचाही मोलाचा वाटा आहे, हे निश्चित.



Scanned with OKEN Scanner